विभागीय /जिल्हा/ तालुका आस्थापनेवरील
अस्थायी पुरवठा पदे पुढे चालू ठेवण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.४४/ना.पु.१५,**
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७.

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र -१०९७/प्रक्र. ३२९२/ना.पु. १५, दि.३.११.१९९७.
२) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र -१०९४/१६६०/प्र.क्र. २३८७/ना.पु. १५, दि.२५.७.९७.
३) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र -१०९८/१६१५/प्र.क्र. ३४८२/ना.पु. १५, दि.२०.२.९९.
४) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र -१०९९/९२८/प्र.क्र. ३६७१/ ना.पु. १५, दि. ३.१०.२०००
५) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-१००१ /२०७२/प्र.क्र.४२०९/ना.पु.१५, दि. २८.९.२००५
६) विभागीय आयुक्त, नागपूर यांचा कार्या.आदेश क्र.पुरवठा/कार्या/१६(१)/कावि/१९८१/ २००५, दि.२१.१०.२००५
७) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४०६/प्र.क्र.५०२७/ना.पु.१५, दि. १४ .३.२००६.
८) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४०७/१९२९/प्र.क्र.५२०६/ना.पु.१५, दि.९.३.२००७ व दि.२९.५.२००७
९) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४०८/४२२/प्र.क्र.५५६९/ना.पु.१५, दि.१४.३.२००८.
१०) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-१००९/प्र.क्र.२४/ना.पु.१५, दि.२०.३.२००९.
११) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१०/१६५/प्र.क्र.३३५/ना.पु.१५, दि.५.५.२०१०.
१२) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१०/प्र.क्र.६२०/ना.पु.१५, दि. १.४.२०११.
१३) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१०/प्र.क्र.१०५१/ना.पु.१५, दि.३१.३.२०१२.
१४) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१३/प्र.क्र.८/ना.पु.१५, दि.२५.४.२०१३.
१५) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१३/प्र.क्र.३००/ना.पु.१५, दि.१५.३.२०१४.
१६) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२८१३/प्र.क्र.२८५/ना.पु.१५, दि.२०.८.२०१४.
१७) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१५/प्र.क्र.५६/ना.पु.१५, दि.१७.४.२०१५.
१८) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२०१६/प्र.क्र.६३/ना.पु.१५, दि.२६.४.२०१६.
१९) शासन निर्णय क्रमांक आस्थाप्र-२४१७/प्र.क्र.४४/ना.पु.१५, दि.२५.४.२०१७.

## -: शासन निर्णय :-

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभागीय/ जिल्हा/ तालुका स्तरावरील विविध योजना/कामासाठी राज्यात असलेल्या एकूण ३२०२ मंजूर पुरवठा पदांच्या ८० टक्के पदांपैकी सन १९६४ मध्ये कायम केलेली २२६ पुरवठा पदे वगळता एकूण २३३४ अस्थायी पुरवठा पदे संदर्भीय दिनांक २९.१.१९९१ च्या शासन निर्णयान्वये स्थायी करण्यात आली आहे. तसेच राज्यातील आदीवासी क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या पुरवठा निरीक्षकांच्या १०० पदापैकी ८० पदे संदर्भीय दिनांक ३.११.९७ च्या शासन निर्णयान्वये स्थायी करण्यात आलेली आहेत. त्यानुसार उर्वरीत ६४२ अस्थायी पुरवठा पदे, पुरवठा निरिक्षकांची २० अस्थायी पदे, केंद्रशासनाच्या अर्थसहाय्याने अमरावती जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या गोदांमाकरिता संदर्भीय दिनांक २५.७.९७ च्या शासन

निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेली गोदाम कर्मचा-यांची २ अस्थायी पदे, नवनिर्मित नंदूरबार व वाशिम आणि हिंगोली व गोंदिया या जिल्ह्यांसाठी अनुक्रमे दिनांक २०.२.९९ व ३.१०.२००० च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेली ३८ अस्थायी पदे, अशी एकूण ७०२ अस्थायी पुरवठा पदे दिनांक २८.२.२०१३ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भीय क्रमांक १३ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती.

२. तथापि, जिल्हाधिकारी, जळगाव कार्यालयाने त्यांच्या दि.१८.९.२०१२ आदेशान्वये पुरवठा विभागातील सर्व संवर्गातील १४७ पदांच्या सुधारित आकृतीबंधाबाबतचे आदेश निर्गमित केल्यामुळे, गतवर्षी एकूण ३३ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार विभागीय / जिल्हा / तालुका स्तरावरील ७०२ पदांऐवजी एकूण ७२८ पदांना दि.१.३.२०१३ पासून दि. २८.२.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये नवनिर्मित पालघर जिल्हयासाठी पुरवठा विभागाची ६ पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी वाहनचालकाचे एक पद बाहयस्त्रोताद्वारे भरण्यास मंजूरी देण्यात आली आहे. उर्वरित पाच अस्थायी पदांना मुदतवाढ द्यावयाची आहे. त्यामुळे विभागीय/ जिल्हा/तालुका स्तरावरील ७२८ पदांऐवजी एकूण ७३३ पदांना दिनांक १ मार्च, २०१७ ते दि.३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

४. विविध योजनेअंतर्गतची ७३३ अस्थायी पुरवठा पदे पुढीलप्रमाणे असून (सदर ७३३ अस्थायी पदांच्या सविस्तर माहितीचे १४ तक्ते यासोबत जोडले आहेत.) सदरहू अस्थायी पदांना, सदर पदे ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून रिक्त नाहीत या अटीच्या अधीन राहून दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | योजना/ कामाचे नाव | एकूण अस्थायी पदे |
|---|---|---|
| १ | राज्यांतर्गत आधारभूत किंमत धान्य खरेदी योजनेखालील पदे. | १८७ |
| २ | राज्यांतील सिमेंट वाटप योजनेखालील पदे. | ८० |
| ३ | सार्वजनिक वितरण व्यवस्थेखाली लेव्ही साखरेचे वाटप करण्यासाठी पदे. | २९ |
| ४ | विदर्भातील तहसिल पुनर्रचनेनंतर नव्याने निर्माण केलेल्या ६६ तहसिल कार्यालयांतील पुरवठा पदे. | १३२ |
| ५ | मारेगांव,जि. यवतमाळ येथील गोदामासाठी गोदाम कर्मचाऱ्यांची पदे | ३ |
| ६ | अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांच्या आस्थापनेवरील पदे. | ९ |
| ७ | अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या आस्थापनेवरील पदे. | १३ |
| ८ | अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर यांच्या आस्थापनेवरील पदे. | २३ |
| ९ | अन्नधान्य वितरण अधिकारी,नागपूर यांच्या आस्थापनेवरील पुनर्वाटप केलेली पदे. | १३ |
| १० | विभागीय संकोषातील गोदाम कर्मचाऱ्यांची पदे. | १६२ |
| ११ | नागपूर विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | १ |
| १२ | कोकण विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | ८ |

| | | |
|---|---|---|
| १३ | नाशिक विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | १० |
| १४ | अमरावती विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | २ |
| १५ | औरंगाबाद विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | १ |
| १६ | राज्यातील आदिवासी क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली पुरवठा निरिक्षकांची पदे | २० |
| १७ | केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने अमरावती जिल्हयात बांधण्यात आलेल्या गोदामाकरिता निर्माण करण्यात आलेली गोदाम कर्मचाऱ्यांची पदे. | २ |
| १८ | नवनिर्मित नंदूरबार, वाशीम, गोंदिया व हिंगोली जिल्हयासाठी निर्माण करण्यात आलेली पदे | ३८ |
| | **एकूण** | **७३३** |

५. उपरोक्त अस्थायी पदांवरील खर्च सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा व तो "मागणी क्र.एम-२, २४०८-अन्न साठवण व वखार साठवण , १०१ प्रापण व पुरवठा, (०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०३)(०२) मुफसल, दत्तमत योजनेतर (२४०८ ०१०८) ०१ वेतन" या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : असंक-१००४/ प्र.क्र.१२ (भाग-२) २००४/ वित्तीय सुधारणा-१, दि.४ ऑक्टोबर, २००४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयांनी अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यापूर्वी सदर अस्थायी पदे तपासून खात्री करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१२१५३८२३४९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

Nagappa Chandappa Imade

Digitally signed by Nagappa Chandappa Imade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S And C.P. Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8c8889a1f9e9a9ee73d9ef011894f7ad17eb5856e6321859 8e7f8b9b423349a1, serialNumber=19a4d4d79d3533e917f33e30be7fb33aee65b0315d 18be024e91a9b055d1db73, cn=Nagappa Chandappa Imade
Date: 2017.10.12 15:29:16 +05'30'

**(ना. चं. इमडे)**

सोबत :- १४ तक्ते

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) सर्व उपायुक्त ( पुरवठा )
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
५) अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे, सोलापूर, नागपूर.
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

७) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
८) महालेखापाल -१, महाराष्ट्र ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई.
९) महालेखापाल -१, महाराष्ट्र ( लेखा परीक्षा ), मुंबई
१०) महालेखापाल -२, महाराष्ट्र ( लेखा व अनुज्ञेयता ) , नागपूर.
११) महालेखापाल -२ , महाराष्ट्र ( लेखा परीक्षा ), नागपूर.
१२) महालेखापाल -१ , महाराष्ट्र ( वाणिज्य लेखा परीक्षा ), महर्षी कर्वे रोड, मुंबई २०.
१३) वित्त विभाग ( व्यय -४ ), मंत्रालय, मुंबई - ३२.
१४) वित्त विभाग ( अर्थसंकल्प १९), मंत्रालय, मुंबई ३२.
१५) कार्यासन अधिकारी, ना.पु.१२, १६-ब, १८, १९, २८ व २९,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई ३२.
१६) निवड नस्ती ( कार्यासन ना.पु.१५)

## शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र २४१७/ प्र.क्र.४४/ना.पु. १५,दि. १२.१०.२०१७ सोबतचे तक्ते.

### तक्ता क्रमांक - १

**मारेगाव, जिल्हा यवतमाळ येथील गोदामासाठी दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली गोदाम कर्मचा-यांची अस्थायी पदे.**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | गोदाम पालक ( वर्ग - ३) | १ |
| २ | हमाल तथा सफाई कामगार ( वर्ग - ४ ) | १ |
| ३ | पहारेकरी (वर्ग - ४ ) | १ |
| **एकूण पदे** | | **३** |

### तक्ता क्रमांक - २

**केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने अमरावती जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या गोदामाकरीता निर्माण करण्यात आलेली गोदाम कर्मचा-यांची दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे.**

| अ. क्र. | पदाचे नांव | एकूण पदे |
|---|---|---|
| १ | गोदाम रक्षक ( वर्ग- ३ ) | १ |
| २ | गोदाम पहारेकरी ( वर्ग - ४ ) | १ |
| **एकूण पदे** | | **२** |

**तक्ता क्रमांक - ३**

**राज्यांतर्गत आधारभूत किंमत धान्य खरेदी योजनेखाली दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे.**

| अ. क्र. | जिल्ह्याचे नांव | खरेदी अधिकारी (वर्ग-२) | धान्य खरेदी निरीक्षक (वर्ग -३) | अव्वल कारकून (वर्ग-३) | लेखा पर्यवेक्षक (वर्ग-३) | लिपिक-टंकलेखक (वर्ग-३ ) | शिपाई (वर्ग-४) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १ | ५ | ४ | १ | १ | - | १२ |
| २ | रायगड | १ | ५ | ३ | १ | - | १ | ११ |
| ३ | सिंधुदुर्ग | - | २ | - | - | - | - | २ |
| ४ | धुळे | - | ३ | २ | - | १ | - | ६ |
| ५ | जळगांव | - | - | ११ | - | ६ | ३ | २० |
| ६ | अहमदनगर | - | - | १ | - | - | - | १ |
| ७ | सांगली | - | १ | १ | - | १ | १ | ४ |
| ८ | औरंगाबाद | - | १ | २ | - | - | - | ३ |
| ९ | जालना | - | २ | २ | १ | १ | - | ६ |
| १० | लातूर | १ | ५ | २ | १ | १ | - | १० |
| ११ | अकोला | १ | ५ | १ | - | १ | - | ८ |
| १२ | अमरावती | १ | ८ | २ | - | - | - | ११ |
| १३ | यवतमाळ | १ | १० | २ | - | १ | - | १४ |
| १४ | भंडारा | १ | १४ | ३ | २ | १ | २ | २३ |
| १५ | चंद्रपूर | २ | १४ | ३ | २ | १ | २ | २४ |
| १६ | गडचिरोली | - | १४ | ३ | १ | १ | १ | २० |
| १७ | नागपूर | - | ३ | - | - | - | - | ३ |
| १८ | वर्धा | - | ३ | - | - | - | - | ३ |
| १९ | आयुक्त, कोकण विभाग | १ | - | १ | - | १ | - | ३ |
| २० | आयुक्त, औरंगाबाद विभाग | १ | १ | - | - | - | - | २ |
| २१ | आयुक्त , नागपूर विभाग | १ | - | - | - | - | - | १ |
| | **एकूण -** | **१२** | **९६** | **४३** | **९** | **१७** | **१०** | **१८७** |

## तक्ता क्रमांक - ४

## राज्यातील सिंमेट वाटप योजनेखालील दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | निरीक्षक वर्ग - ३ | वरीष्ठ लिपिक वर्ग - ३ | टंकलेखक वर्ग - ३ | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक पद याप्रमाणे २४ जिल्ह्यांसाठी पदे (चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, उस्मानाबाद, हिंगोली, लातूर, रत्नागिरी, नंदूरबार, वाशिम व बृहन्मुंबई हे जिल्हे वगळून) | २४ | २४ | २४ | ७२ |
| २ | चंद्रपूर | १ | - | १ | २ |
| ३ | गडचिरोली | - | १ | - | १ |
| ४ | उस्मानाबाद | १ | - | १ | २ |
| ५ | लातूर | - | १ | - | १ |
| ६ | रत्नागिरी | - | १ | १ | २ |
| | **एकूण पदे** | **२६** | **२७** | **२७** | **८०** |

## तक्ता क्रमांक -५

## विदर्भातील तहसिल पुनर्रचनेनंतर नव्याने निर्माण केलेल्या ६६ तहसिल कार्यालयातील दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अतिरिक्त अस्थायी पुरवठा पदे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | अव्वल कारकून | लिपिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ७ | ७ | १४ |
| २ | अकोला | ७ | ७ | १४ |
| ३ | बुलढाणा | ८ | ८ | १६ |
| ४ | यवतमाळ | ९ | ९ | १८ |
| ५ | नागपूर | ९ | ९ | १८ |
| ६ | वर्धा | ४ | ४ | ८ |
| ७ | भंडारा | १० | १० | २० |
| ८ | चंद्रपूर | ६ | ६ | १२ |
| ९ | गडचिरोली | ६ | ६ | १२ |
| | **एकूण पदे** | **६६** | **६६** | **१३२** |

तक्ता क्रमांक - ६

**अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांच्या आस्थापनेवरील दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे,**

| अ.क्र. | पदाचे नांव | अस्थायी पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | अन्नधान्य वितरण अधिकारी ( वर्ग - १ ) | १ |
| २ | पुरवठा लेखापाल ( वर्ग - ३ ) | २ |
| ३ | उप लेखापाल ( वर्ग- ३ ) | १ |
| ४ | लेखा लिपिक ( वर्ग - ३ ) | ५ |
| **एकूण पदे -** | | **९** |

तक्ता क्रमांक - ७

**अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या आस्थापनेवरील दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे,**

| अ.क्र. | पदाचे नांव | अस्थायी पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | अन्नधान्य वितरण अधिकारी ( वर्ग - १ ) | १ |
| २ | पुरवठा लेखापाल ( वर्ग - ३ ) | २ |
| ३ | लेखा पर्यवेक्षक ( वर्ग - ३ ) | १ |
| ४ | उप लेखापाल ( वर्ग- ३ ) | १ |
| ५ | लेखा लिपिक ( वर्ग - ३ ) | ८ |
| **एकूण पदे -** | | **१३** |

तक्ता क्रमांक - ८

**अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर यांच्या आस्थापनेवरील दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे**

| अ. क्र. | पदाचे नांव | अस्थायी पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | अन्नधान्य वितरण अधिकारी ( वर्ग - १ ) | २ |
| २ | लेखा लिपिक ( वर्ग - ३) | ८ |
| ३ | पुरवठा लेखा पर्यवेक्षक/ लेखापाल ( वर्ग - ३ ) | ३ |
| ४ | उप लेखापाल ( वर्ग- ३ ) | १ |
| ५ | सफाई कामगार-वर्ग-४ (अंशकालीन) (रुपये ८०/- नियत वेतन) | ९ |
| **एकूण पदे** | | **२३** |

तक्ता क्रमांक - ९

## अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर यांच्या आस्थापनेवरील पुनर्वाटप केलेली व दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे

| अ. क्र. | पुनर्वाटप केलेले कार्यालय | सहाय्यक लेखा अधिकारी/उपलेखापाल / अ.का.(लेखा) | सहाय्यक लेखा अधिकारी/उप लेखापाल/ अ.का.(लेखा) उप लेखापाल / अ.का.(लेखा) | लिपिक - टंकलेखक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली | १ | ० | ४ | ५ |
| २ | जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया | १ | ० | १ | २ |
| ३ | जिल्हा पुरवठा अधिकारी, भंडारा | १ | ० | १ | २ |
| ४ | जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर | १ | ० | ४ | ५ |
| **एकूण पदे** | | **४** | **०** | **१०** | **१४** |

तक्ता क्रमांक - १०

## विभागीय संकोषातील गोदाम कर्मचा-यांची दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे

| अ. क्र. | विभाग | गोदाम पालक (वर्ग - ३) | गोदाम पहारेकरी (वर्ग - ४) | सफाई कामगार (वर्ग - ४) | एकूण अस्थायी पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | --- | --- | ७ | ७ |
| २ | पुणे | १० | १० | १३ | ३३ |
| ३ | औरंगाबाद | --- | ३५ | ३८ | ७३ |
| ४ | नागपूर | १ | --- | ६ | ७ |
| ५ | अमरावती | ११ | २४ | ७ | ४२ |
| **एकूण पदे** | | **२२** | **६९** | **७१** | **१६२** |

**तक्ता क्रमांक - ११**

**नवनिर्मित नंदूरबार, वाशिम, हिंगोली व गोंदिया जिल्ह्यांसाठी मंजुर करण्यात आलेली दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पुरवठा पदे.**

| अ. क्र. | पदनाम | नंदूरबार | वाशिम | हिंगोली | गोंदिया | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा पुरवठा अधिकारी | १ | १ | १ | १ | ४ |
| २ | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी | १ | १ | १ | १ | ४ |
| ३ | सहायक लेखा अधिकारी | १ | १ | १ | १ | ४ |
| ४ | निरीक्षण अधिकारी | १ | १ | १ | १ | ४ |
| ५ | अव्वल कारकून | १ | १ | १ | १ | ४ |
| ६ | पुरवठा निरीक्षक | १ | १ | - | - | २ |
| ७ | लघुटंकलेखक | १ | १ | १ | १ | ४ |
| ८ | लिपिक | २ | २ | १ | १ | ६ |
| ९ | शिपाई | २ | २ | १ | १ | ६ |
| **एकूण पदे -** | | **११** | **११** | ८ | ८ | **३८** |

**तक्ता क्रमांक- १२**

**राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेखाली लेव्ही साखरेचे वाटप करण्यासाठी दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे**

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पदे |
|---|---|---|
| १ | सहायक अधिक्षक (साखर) (वर्ग - ३) २९ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १ पद (नंदूरबार, हिंगोली, वाशिम, गोंदिया, पालघर व बृहन्मुंबई वगळून) | २९ |
| | **एकूण पदे** | २९ |

**तक्ता क्रमांक - १३**

**राज्यातील आदीवासी क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली पुरवठा निरीक्षकांची दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे,**

| अ. क्र. | जिल्ह्याचे नांव | पुरवठा निरीक्षकांची अस्थायी पदे |
|---|---|---|
| १ | ठाणे | ३ |
| २ | नाशिक | ३ |
| ३ | धुळे | १ |
| ४ | नंदूरबार | २ |
| ५ | नांदेड | १ |
| ६ | अमरावती | १ |
| ७ | नागपूर | १ |
| ८ | भंडारा | १ |
| ९ | यवतमाळ | १ |
| १० | गडचिरोली | ३ |
| ११ | चंद्रपूर | ३ |
| **एकूण पदे -** | | **२०** |

**तक्ता क्रमांक - १४**

**विविध योजना / कामासाठी मंजूर केलेली दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे**

| अ. क्र. | योजना / कामाचे नांव | पदाचे नांव | जिल्हा | अस्थायी पदे |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | खरेदी अधिकारी, गट - ब | गडचिरोली | १ |
| २ | कोकण विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी<br>धान्य खरेदी अधिकारी<br>लेखा अधिकारी<br>सहायक लेखा अधिकारी<br>वाहतूक अधिकारी, गट-ब<br>वाहतूक अधिकारी, गट-ब | ठाणे<br>पालघर<br>पालघर<br>पालघर<br>पालघर<br>पालघर<br>रत्नागिरी<br>सिंधुदूर्ग | १<br>१<br>१<br>१<br>१<br>१<br>१<br>१ |
| ३ | नाशिक विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ<br>पुरवठा निरीक्षक, गट-क | अहमदनगर<br>जळगांव | १<br>९ |
| ४ | अमरावती विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ हमाल तथा सफाई कामगार, गट-ड. (अंशकालीन दरमहा एकत्रित पगार) | अकोला<br>बुलढाणा | १<br>१ |
| ५ | औरंगाबाद विभागातील जिल्हा व तहसिल स्तरावरील पदे | जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ | जालना | १ |
| **एकूण** | | | | **२२** |

**********